प्रेसनोट दि. २९/०७/२०१७

पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगारास अटक करुन १ पिस्टल व २ काडतुसे गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक विभागाकडुन जप्त

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर,या पथकातील पोलीस पो.हवा./३२७९ अजय थोरात यांना दि. २८/०७/२०१७ रोजी बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील वारजे येथे राहणारे गुन्हेगार नामे नामे अक्षय अशोक टिंगरे वय २० वर्षे रा.आकाश नगर,वारजे पुणे. हा अंबीका गादी कारखाना वारजेमाळवाडी, येथे येणार आहे व त्याचे जवळ गावठी पिस्टल आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कदम यांनी अधिनस्त पोलीसांचे पथक तयार करुन बातमीचे ठिकाणी दुपारी ०३.४५ वाजणेचे सुमारास छापा टाकुन वरील नमुद इसमास ताब्यात घेतले आहे. त्यांचे कब्जातून १ गावठी बनवाटीचे पिस्टल मॅगझीनसह, व २ जिवंत काडतुसे असा सर्व मिळून ४०,४००/- चा माल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांचे विरुध्द **वारजे पोस्टे येथे गुरनं २९४/२०१७ आर्म ॲक्ट कलम ३ सह (२५), व मु.पो.ॲक्ट कलम ३७(१) सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यांच्या अनुषंगाने त्यांच्याकडे तपास करता त्याचे विरुध्द वारजे पोलीस ठाणे येथे शरिराविरुध्दचे गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक संजय दळवी,कर्मचारी,अजय थोरात, रामदास गोणते, विल्सन डिसोझा यांनी केली आहे.